20-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 19-03-2025 22:14 Page 1



आगोंद कासव संवर्धन क्षेत्रातील ६७ व्यवसाय बंद करा » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



वाचनातून स्मरणशक्ती, आत्मविश्वास वाढतो » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २० मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 197 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 20 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# प्रश्नपत्रिका चोरीप्रकरणी तथ्य शोध अहवाल सादर

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १९ :गोवा विद्यापीठातील भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिका चोरीप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या दोन सदस्यीय तथ्य शोध समितीने बुधवारी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हरिलाल बी. मेनन यांच्याकडे अहवाल सादर केला. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिजिकल अँड अप्लाइड सायन्सेसमधील एका सहाय्यक प्राध्यापकाच्या बाबतीत हे प्रकरण उघडकीस आले असून, त्यानंतर सदर प्रकरणी संबंधित प्राध्यापकाला निलंबित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी समितीच्या २८ मार्च रोजी होणाऱ्या बैठकीत या अहवालावर चर्चा होणार आहे**





दरम्यान, संशयित सहाय्यक प्राध्यापकाला सोमवारी निलंबित करण्यात आले. संबंधित प्राध्यापकावर परीक्षा प्रश्नपत्रिका एका विद्यार्थिनीला उघड केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी काशीनाथ शेट्ये आणि इतरांनी आगशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

आगशी पोलिस या प्रकरणी पुढील चौकशीसाठी तथ्य शोध समितीच्या अहवालाची प्रत मिळण्याची प्रतीक्षा करत आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल अद्याप पोलिसांकडे पोहोचलेला नाही. गोवा विद्यापीठाने औपचारिक तक्रार दाखल केल्यावरच पुढील कारवाई होईल, असे पोलिस अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

काशीनाथ शेट्ये आणि इतर कार्यकर्त्यांनी या तक्रारीच्या प्रगतीबाबत चौकशी केली असता पोलिसांनी सांगितले की, तपास अद्याप सुरू आहे. मात्र, आतापर्यंत कोणताही गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. बीएनएसएसनुसार, पोलिसांना एफआयआर नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशीसाठी १४ दिवसांचा कालावधी दिला जातो. कलम १७३ (३) अंतर्गत प्रथमदर्शनी गुन्हा आढळल्यास पुढील तपासाची प्रक्रिया राबवली जाईल, असे पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शेट्ये यांनी आता उत्तर गोवा पोलीस अधीक्षकांना पत्र लिहून, सहाय्यक प्राध्यापक आणि संबंधित विद्यार्थ्यांमधील व्हॉट्सअॅप संभाषणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. गोवा विद्यापीठ या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला. तसेच, तथ्य शोध समितीच्या अहवालाची प्रत त्यांना देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. उपाध्यक्ष हा अहवाल का लपवत आहेत ? असा सवाल शेट्ये यांनी उपस्थित केला आहे.

# पेपरफुटी प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** गोवा काँग्रेस, नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया आणि इंडियन युथ काँग्रेसच्या शिष्टमंडळाने बुधवारी राजभवनात राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांची भेट घेऊन गोवा विद्यापीठातील पेपरफुटी प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी केली. विद्यापीठ प्रशासनाने एका प्राध्यापकाला संरक्षण दिल्याचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

एनएसयूआय गोवाचे अध्यक्ष नौशाद चौधरी म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी आम्ही पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून तपास सुरू आहे. मात्र, आम्हाला शंका आहे की विद्यापीठ प्रशासन प्रकरणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आम्ही आज राज्यपालांची भेट घेऊन सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

चौधरी पुढे म्हणाले, विद्यापीठाने प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन वरिष्ठ सदस्यांसह एक तथ्य शोध समिती स्थापन केली आहे. मात्र, आम्हाला तपासाच्या पारदर्शकतेबाबत शंका आहे. त्यामुळे राज्यपालांनी स्वतः लक्ष घालून चौकशीला दिशा द्यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

जर प्राध्यापक दोषी आढळले, तर त्यांना केवळ निलंबित न करता विद्यापीठातून काढून टाकावे. याशिवाय, विद्यापीठाचे कुलसचिव आणि कुलगुरूंनी देखील जबाबदारी स्वीकारावी आणि त्यांच्यावरही कारवाई व्हावी, अशी मागणी चौधरी यांनी केली. आयवायसी गोवाचे कार्यकारी अध्यक्ष महेश नाडर म्हणाले, या प्रकरणावर आम्ही अजूनही असमाधानी आहोत. संबंधित दोषींना विद्यापीठातून काढून टाकल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. यासंदर्भात योग्य ती कारवाई झाली नाही, तर आम्ही आंदोलन तीव्र करू.

## निवडक

### सत्येंद्र जैन यांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली, दि. १९ :** दिल्लीतील ५७१ कोटी रुपयांच्या सीसीटीव्ही प्रकल्प घोटाळ्यात भ्रष्टाचार आणि लाचखोरीचा आरोप करत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) आप नेते आणि माजी आमदार सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहआयुक्त आणि एसीबी प्रमुख मधुर वर्मा यांच्या मते, सत्येंद्र जैन यांनी दिल्लीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यास विलंब केल्याबद्दल भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) ला लावण्यात आलेला १६ कोटी रुपयांचा दंड मनमानीपणे माफ केला. त्या बदल्यात जैन यांनी ७ कोटी रुपयांची लाच घेतली होती. सीसीटीव्ही प्रकल्पात, इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड कंपनीने कॅमेरे बसवताना चुका केल्या होत्या. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत, बहुतेक कॅमेरे सदोष असल्याचे आढळून आले. सत्येंद्र जैन हे या प्रकल्पाचे नोडल अधिकारी होते. तपासादरम्यान, बीईएलच्या एका अधिकाऱ्याने अनियमिततेची तक्रार केली, ज्यामुळे आरोपांना पुष्टी मिळाली. अधिक पुराव्यांसाठी पीडब्ल्यूडी आणि बीईएलच्या कागदपत्रांची तपासणी केली जात आहे.

---

### जम्मूत एनआयएचे १२ ठिकाणी छापे

**जम्मू, दि. १९ :** राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) जम्मू आणि काश्मीरमध्ये पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. काश्मीरमध्ये १२ ठिकाणी छापे टाकून शोध मोहीम राबविली. सीमेपलीकडून दहशतवाद्यांच्या घुसखोरीशी संबंधित एका प्रकरणासंदर्भात राष्ट्रीय तपास संस्था छापे टाकण्यात येत आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, २४ ऑक्टोबर रोजी, एनआयएने आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवरून लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदशी संबंधित सक्रिय दहशतवाद्यांच्या भारतीय हद्दीत घुसखोरीबाबतच्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल केला होता. एनआयएने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये या प्रकरणासंदर्भात असाच शोध घेतला होता. या काळात 'एनआयए'ने संशयितांच्या परिसरातून अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त केली होती.

---

### लालूंची ईडीकडून झाडाझडती सुरू

**पाटना, दि. १९ :** जमिनीच्या बदल्यात नोकरी प्रकरणी बिहारचे माजी मुख्यमंत्री व राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव बुधवारी सक्तवसुली संचालनालय (ईडी ) कार्यालयात हजर झाले. या प्रकरणी काल ईडीने लालू प्रसाद यांच्या पत्नी आणि बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडी देवी, त्यांची मुलगी मीसा भारती आणि मुलगा तेज प्रताप यादव यांची सुमारे चार तास चौकशी झाली होती. जमिनीच्या बदल्यात नोकरी प्रकरणी 'ईडी'ने लालूप्रसाद यादव यांना समन्स बजावले होते. त्यांना आज सकाळी ११ वाजता ईडी कार्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले होते. लालू प्रसाद यादव नियोजित वेळेच्या सात मिनिटे आधी 'ईडी' कार्यालयात दाखल झाले. त्यांच्यासोबत राजद खासदार आणि त्यांची मुलगी मीसा भारती आहेत. दरम्यान, ईडी कार्यालयाबाहेर राजद कार्यकर्त्यांची मोठी गर्दी केली.

### हवामान

कमाल : ३८ किमान : २६
आर्द्रता : ६८

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,३८२ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०२,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७५,४४९ .०५ ↑ (१४७.७९ )
निफ्टी : २२,९०७.६० ↑ (७३.३०)

# वन्यजीव अभयारण्यात लोहखनिज हाताळणीस विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९ :** भगवान महावीर वन्यजीव अभयारण्य आणि मोले राष्ट्रीय उद्यानातील कुळे रेल्वे स्थानकावर लोहखनिज हाताळणीस परवानगी देऊ नये, अशी ठाम मागणी सेव्ह मोले गटाने केली आहे. गोवा राज्य वन्यजीव मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक २० मार्च २०२५ रोजी होणार असून, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीत दक्षिण पश्चिम रेल्वे आणि वेदांत लिमिटेडने सादर केलेल्या वादग्रस्त प्रस्तावावर चर्चा होणार आहे.

या प्रस्तावात कर्नाटकातून कुळे रेल्वे स्थानकावर लोहखनिज उतरवून ते वाहतूक करण्यास परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे अभयारण्याच्या जैवविविधतेला धोका निर्माण होऊ शकतो, असा पर्यावरण कार्यकर्त्यांचा इशारा आहे. मुख्य वन्यजीव वॉर्डनने ४ एप्रिल २०२४ रोजी लिहिलेल्या पत्रात या प्रस्तावाची अधिकृत नोंद घेतली असून, त्यामुळे या उपक्रमाचा थेट परिणाम संरक्षित जमिनीवर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भगवान महावीर वन्यजीव अभयारण्य आणि मोले राष्ट्रीय उद्यान हे गोव्यातील सर्वात जुने आणि विस्तीर्ण संरक्षित क्षेत्र असून, ते सुमारे २४० चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर पसरले आहे. हे क्षेत्र जागतिक जैवविविधतेचे केंद्र म्हणून ओळखले जाते. या संरक्षित प्रदेशात सुमारे १६ हजार प्रजाती आढळतात, ज्यामध्ये अनेक दुर्मीळ आणि स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, हे अभयारण्य स्थानिक पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

पर्यावरण कार्यकर्त्यांचा दावा आहे की, संरक्षित जमिनीवर व्यावसायिक उपक्रम राबवणे वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ च्या कलम २९ चे थेट उल्लंघन ठरेल. लोखंडाच्या हाताळणीमुळे ध्वनी, वायू आणि जल प्रदूषण वाढेल आणि अभयारण्यातील वन्यजीव आणि पर्यावरणीय संतुलन धोक्यात येईल, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे. संरक्षित क्षेत्राला अशा प्रकारे त्रास दिल्यास जैवविविधतेला मोठा धोका निर्माण होईल, असे सेव्ह मोलेने त्यांच्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

गोवा राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीपूर्वी सेव्ह मोलेने एक व्यापक सार्वजनिक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत नागरिकांनी मंडळाच्या सदस्यांना ईमेल पाठवून या प्रस्तावाचा विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गटाने तयार केलेल्या ईमेल टेम्पलेटमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की,गोव्याच्या संरक्षित वनक्षेत्रात खनिज धातूंची हाताळणी आणि वाहतूक दीर्घकालीन विनाशकारी ठरेल. गोवा राज्य वन्यजीव मंडळात ३१ सदस्य आहेत, ज्यामध्ये राज्य आणि केंद्र सरकारच्या विभागांचे तसेच पर्यावरणीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आहेत. सेव्ह मोले गटाने मुख्यमंत्री, वन विभाग, पर्यटन अधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील सार्वजनिकरित्या शेअर केले आहेत, जेणेकरून लोकांना थेट या प्रस्तावाला विरोध करण्याची संधी मिळेल.

पान २ ▶

# सुनीता विल्यम्सचे ९ महिन्यांनंतर पृथ्वीवर यशस्वी पुनरागमन

**वॉशिंग्टन, दि. १९ :** तब्बल नऊ महिने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी अखेर सर्व अडथळे पार करत यशस्वीपणे पृथ्वीवर पुनरागमन केले. भारतीय वेळेनुसार मंगळवारी (१९ मार्च) पहाटे ३ वाजून २७ मिनिटांनी फ्लोरिडाच्या समुद्रात स्पेसएक्स ड्रॅगन फ्रीडम यानाचे सुरक्षित लँडिंग झाले.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी ५ जून २०२४ रोजी बोईंग स्टारलायनरया परीक्षण यानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे झेप घेतली होती. ही मोहीम केवळ आठ दिवसांची असणार होती; मात्र, अंतराळयानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ही मोहीम लांबली आणि ते दोघेही नऊ महिने अंतराळात अडकून पडले.

स्पेसएक्सच्या ड्रॅगन फ्रीडम यानामधून आणखी चार अंतराळवीरांना परत आणण्यासाठी विशेष मोहीम आखण्यात आली होती. फ्लोरिडाच्या पूर्व किनारपट्टीवरील टॅलाहासी येथे अनुकूल हवामान असल्यामुळे ही लँडिंग साइट निवडण्यात आली होती. पृथ्वीच्या वातावरणात शिरल्यानंतर 'पिका ३.० हीटशील्ड' ने कॅप्सूलचे संरक्षण केले, तर स्पेससूटमधून थंड हवा खेळवल्यामुळे अंतराळवीरांच्या शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यात आले.

ड्रॅगन फ्रीडम पृथ्वीच्या वातावरणात शिरताना कॅप्सूलभोवतीचे तापमान १९२६ अंश सेल्सिअस पर्यंत वाढले होते. कॅप्सूल पृथ्वीच्या कक्षेत असताना काही काळ ग्राउंड कंट्रोलसोबतचा संपर्क तुटला होता; मात्र, काही मिनिटांनंतर संपर्क पुन्हा प्रस्थापित झाला. प्रथम १८ हजार फूट उंचीवरून प्राथमिक पॅराशूट्स उघडली, त्यानंतर ६ हजार ५०० फूट उंचीवरून मुख्य पॅराशूट्स उघडली. चार पॅराशूट्सच्या मदतीने कॅप्सूलला समुद्रात हळूहळू उतरवण्यात आले. लँडिंग झाल्यानंतर पॅराशूट्स कॅप्सूलपासून स्वयंचलितपणे वेगळी झाली, जेणेकरून कॅप्सूल प्रवाहात ओढली जाणार नाही.



क्रू नाईन बॅक ऑन अर्थ... वेलकम होम अशी घोषणा ग्राउंड कंट्रोलने करत अंतराळवीरांचे स्वागत केले. डब्ल्यू बी - ५७ हाय अल्टिट्यूड विमानाद्वारे ड्रॅगन फ्रीडमच्या प्रवासाचे थेट दृश्य प्रक्षेपित करण्यात आले. रिकव्हरी टीमला समुद्रात पोहोचण्यासाठी साधारण ३० मिनिटे लागली.

पान २ ▶

# स्मार्ट सिटी : ११ दिवस शिल्लक; रस्ते उखडलेलेच

## कामांचा वेग संथगतीने | अद्यापही ३,४५० मीटर रस्त्याचे काम अपूर्णच

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडने दिलेली ३१ मार्चची अंतिम मुदत अवघ्या ११ दिवसांवर येऊन ठेपली असताना, तथाकथित स्मार्ट सिटीच्या कामांचा वेग अत्यंत संथ आणि अव्यवस्थित असल्याचे समोर आले आहे.

इमॅजिन पणजीने दावा केला आहे की प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकारी वचनबद्ध आहेत. मात्र प्रत्यक्षात, अजूनही काही महत्त्वाची कामे प्रलंबित आहेत. इमॅजिन पणजीने गेल्या महिन्यातच मान्य केले होते की मध्य पणजीतील ३,४५० मीटर रस्त्याचे काम अद्याप पूर्ण व्हायचे आहे. गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयात सांतइनेज येथे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, एकूण ३ हजार मीटर रस्त्याच्या कामांपैकी २ हजार ८०० मीटरचे काम पूर्ण झाले असून उर्वरित २०० मीटरचे काम ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मात्र, रुआ दे ओरेममध्ये अद्याप १३ हजार ८०० मीटर रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे समोर आले आहे.

रस्त्यांच्या खोदकामामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. रहिवाशांना कोणतीही पूर्वसूचना न देता रस्त्यांचे खोदकाम आणि पुन्हा खोदकाम वारंवार सुरूच आहे. अनेक ठिकाणी काम पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला असतानाही पुन्हा खोदकाम सुरू असल्याची तक्रार आहे.

अलीकडेच, यूको बँक-गोविंदा बिल्डिंग जंक्शनजवळ, विशाल मेगा मार्ट जंक्शन आणि आत्माराम बोरकर रोड येथे अचानक रस्ते खोदण्यात आले. यामुळे स्थानिक व्यावसायिकही अडचणीत आले आहेत. परिस्थिती खूप वाईट आहे. ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. मी अनेक वर्षांपासून व्यवसायात आहे, त्यामुळे जुने ग्राहक भेट देतात, पण नवीन ग्राहक येण्याचे प्रमाण कमी झाले आहे, असे आत्माराम बोरकर रोडवरील एका दुकानदाराने सांगितले.

दुसऱ्या एका दुकानदाराने सांगितले की, बहुतेक दुकाने आर्थिक संकटात सापडली आहेत. कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च भागवताना अडचणी येत आहेत. काम कधी पूर्ण होणार, हेही स्पष्ट नाही. रस्ते कधी उघडले जातात, तर कधी अचानक बंद होतात. हे काम अपूर्ण अवस्थेतच आहे. काम करणाऱ्या कामगारांनाही कामे मुदतीत पूर्ण होतील का, याबाबत शंका आहे. ज्या कामांना



अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळाली आहे, तीच कामे अंतिम मुदतीपर्यंत पूर्ण होतील, असे स्मार्ट सिटीच्या कामात गुंतलेल्या एका कामगाराने सांगितले. शहरातील रहिवासी डॉ. ओडेट लोबो यांनी सांगितले की, ३१ मार्च २०२५ पूर्वी काम पूर्ण होईल, असे मला वाटत नाही. संपूर्ण काम हास्यास्पद बनले आहे. मळा, आल्तिनो, ईडीसीजवळील, डी बी मार्ग किंवा १८ जून रोडवरील रस्त्यांची स्थिती पाहा, सर्वत्र गोंधळ आहे. कंत्राटदारांचा फायदा होण्याव्यतिरिक्त काहीही साध्य झालेले नाही.

शहरातील आणखी एक रहिवासी शालिनी नाईक यांनी सांगितले की, रस्ते आणि पदपथ दोन्ही खोदले गेले आहेत, त्यामुळे चालणे खूप कठीण झाले आहे. हे मुलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिक धोकादायक ठरत आहे. रस्ते आणि पदपथ यामध्ये मोठे अंतर आहे. ते एकाच पातळीवर कधी आणले जातील, हे अद्याप स्पष्ट नाही. इमॅजिन पणजीने प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचा दावा केला असला तरी, कामाचा संथ वेग आणि अव्यवस्था पाहता, ३१ मार्चची अंतिम मुदत गाठणे अशक्य असल्याचे स्थानिकांचे मत आहे. रस्त्यांची उखड-उखड आणि प्रदूषणामुळे रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. आता हे प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होणार की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



